# ई - पोलीस पत्रिका

दिनांक २८/१०/२०२४ अनु.क्र.१९६

**(अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)**

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महीला, मुले व जेष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.
- " सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/पशा-३/बदलीवर हजर-गजभिये/९४४८/२०२४ अमरावती शहर दिनांक २५/१०/२०२४**

## आदेश

मा. विशेष पोलीस महानिरिक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे आदेश क्रमांक : अप/कक्ष-४/ जिल्हा संवर्ग /स.बदल्या-२०२४/वश्रेलि/२०२४/१८०१, दि.३१/०८/२०२४अन्वये जिल्हा लिपीक संवर्गातील खालील नमुद वरिष्ठ श्रेणी लिपीक यांची प्रशासकीय बदलीने या कार्यालयाचे आस्थापनेवर पदस्थापना करण्यांत आली आहे.

| अनु.क्र. | लिपीकांचे नाव व पद | पुर्वीचे नेमणुकीचे कार्यालय | बदली वरील नविन नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती वंदना संतोष गजभिये, वरिष्ठ श्रेणी लिपीक | पोलीस अधीक्षक कार्यालय,अकोला | पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर |

पोलीस अधीक्षक, अकोला यांचे आदेश क्रमांक: पोअअ/पशा-१/मंत्रा.लि./वश्रेलि इंगोले-गजभिये-बोंडे - कश्रेलि देशमुख/कार्यामुक्त/११९४८/२०२४, दि.३०/०९/२०२४ अन्वये श्रीमती वंदना संतोष गजभिये, वरिष्ठ श्रेणी लिपीक यांना पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवर बदलीने पदस्थापना झाल्याने हजर होण्याकामी दि.३०/०९/२०२४ म.नंतर कार्यमुक्त करण्यात आले आहे.त्या या घटाकात दि. २३/१०/२०२४ चे म.पुर्व हजर झाल्या आहेत.

श्रीमती वंदना संतोष गजभिये, वरिष्ठ श्रेणी लिपीक याचादि.०१/१०/२०२४ ते दि.०७/१०/२०२४ पर्यत पदग्रहण अवधी तसेच प्रकृतीच्या कारणास्तव दि.८/१०/२०२४ ते दि.२२/१०/२०२४ पर्यत एकुण १५ दिवस रुग्णनिवेदन कालवधी महाराष्ट्र नागरी सेवा(रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६१ अन्वये परिवर्तीत रजामंजुर करण्यात येत आहे.

श्रीमती वंदना संतोष गजभिये, वरिष्ठ श्रेणी लिपीक यांची पत्रव्यवहार शाखा येथील (इमारत बांधकाम व शस्त्र-दारुगोळा,गणवेष अनुदान/BDDS/DOG Unit ) पशा-५ या कार्यासनावर नेमणुक करण्यात येत आहे.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**०१.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/पोउपनि-वाठोरे + १/९४१३/२०२४ अमरावती शहर दिनांक २४/१०/२०२४**

**संदर्भ क्रमांक :-** या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअश/विचौ-२/कसुरी/नाईट पेट्रोलींग/

का.दा.नो./ पोउपनि-वाठोरे + १/६९३३/२०२४, दिनांक ०१/०८/२०२४

**कसुरदारचे नाव :-** १) श्री आकाश वाठोरे, पोलीस उपनिरीक्षक, २) पोशि/१६३८ शिवराज पवार, सर्व नेमणुकपोलीस स्टेशन फ्रेजरपुरा, अमरावती शहर

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही खालील नमुद पोलीस अधिकारी/अंमलदार सर्व पोलीस स्टेशन सर्व पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर अंतर्गत पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा हद्दीत नाईट पेट्रोलींग म्हणुन तुमचे कर्तव्य नेमण्यात आले होते. तरी तुम्हाला नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थित पार न पाडता तुमची दिनांक २५/०७/२०२४ चे रात्री ००.४५ वा.ते दिनांक २६/०७/२०२४ चे सकाळी ०५.०० वा.पर्यत असतांना तुम्ही नाईट गस्त पेट्रोलींग दरम्यान दिनांक २६/०७/२०२३ चे सकाळी ०३..५० वा.पासुन पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा हद्दीतील महत्वाचे ठिकाणी भेट दिली नसुन गार्ड वरील पोलीस अंमलदार यांना चेक केले नसल्याचे निदर्शनास आले आहे. तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले असुन तुम्हाला नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता व वरिष्ठाने दिलेल्या सुचनांकडे दुर्लक्ष केले असुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.क्र./नाव | नेमणुक | कर्तव्य दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्री आकाश वाठोरे, पोलीस उपनिरीक्षक | पो.स्टे. फ्रेजरपुरा | २५/०७/२०२४ चे रात्री ००.४५ वा. ते २६/०७/२०२४ सकाळी ०५.०० वा. पर्यत |
| २ | पोशि/१६३८ शिवराज पवार | पो.स्टे. फ्रेजरपुरा | २५/०७/२०२४ चे रात्री ००.४५ वा. ते २६/०७/२०२४ सकाळी ०५.०० वा. पर्यत |

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. ५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त)** दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर न केल्याने पुन्हा पत्र क्र.८०५८/२०२४, दिनांक ०६/०९/२०२४ अन्वये कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर करणे करीता पत्राव्दारे एक संधी देण्यात येवुन सुध्दा तुम्ही स्पष्टीकरण सादर केलेले नाही.तरी कारणे दाखवा प्रस्तावीत नोटीस मध्ये देण्यात आलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. ५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त) दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

# वेतन निश्चिती

**०१.पोआअ/आस्था-२/सु.वे.नि./पोहवा-६२५ धंडारे/९४५४/२०२४ अमरावती शहर दिनांक २५/१०/२०२४**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे आदेश क्र.पोआअ/विचौ-१/नि.का.अं./आ/दिवंगत पोहवा-६२५ दंडारे/८८५१/२०२४,
दिनांक ०९.१०.२०२४

## आदेश क्र.(१)

**मयत पोहवा/६२५, पांडुरंग नारायण धंडारे, तत्कालीन नेमणूक पोलीस मुख्यालय,अमरावती शहर,** यांचेविरुद्ध दिनांक ०५.०९.२०२४ रोजी पो.स्टे. गाडगेनगर येथे अप क्र. ३१२९/१४ कलम ७,१३ (१)(ड) सह १३ (२) नुसार भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याने त्यांना **दिनांक ०९.०९.२०१४ ते ३१.१२.२०१५ या कालावधीत निलंबीत करण्यात आले होते.**

तथापी उपरोक्त नमूद संदर्भीय आदेशान्वयेनमूद पोलीस अंमलदार यांचा**दिनांक ०९.०९.२०१४ ते ३१.१२.२०१५** पर्यंतचा निंलबन कालावधी हा म.ना.से. (पदग्रहन अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२(२) च्या तरतुदीनुसार **सर्व प्रयोजनार्थ कर्तव्यकाळ म्हणुन गणण्यात आल्याने** त्यांचीशासन अधिसुचना वित्त विभाग क्र. वेपुर-१२०९/प्र.क्र२७/सेवा-९, दि.२२.०४.२००९ व शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतन नियम २०१९ मधील तरतुदीप्रमाणेखालीलप्रमाणे सुधारीत वेतन निश्चिती करण्यात येत आहे.

| **पदनाम** | **वेतनश्रेणी** | **ग्रेड पे** |
|---|---|---|
| पोलीस हवालदार | रु.५२००-२०२००/- | रु.२५००/- |

| **विद्यमान वेतन व दिनांक** | | | **सुधारीत देय वेतन व दिनांक** | | |
|---|---|---|---|---|---|
| **वेतनवाढीचा दिनांक** | **विद्यमान वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन** | | **वेतनवाढीचा दिनांक** | **सुधारीत वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन** | |
| | **वेतन बँड** | **ग्रेड वेतन** | | **वेतन बँड** | **ग्रेड वेतन** |
| १९/०५/२०१४ | रु.११२४०/- | रु.२५००/- | १९/०५/२०१४ | रु.११२४०/- | रु.२५००/- |
| ०१/०७/२०१५ | रु.११२४०/- दि.०९.०९.२०१४ ते ३१.१२.२०१५ पर्यंत निलंबीत असल्याने वेतनवाढ देय नाही. | रु.२५००/- | ०१/०७/२०१५ | रु.११२४०+४२०=११६६०/- दि.०९.०९.२०१४ ते ३१.१२.२०१५ पर्यंतचा निलंबन कालावधी सर्व प्रयोजनार्थ कर्तव्यकाळ म्हणुन गणण्यात आल्याने देय वेतन. | रु.२५००/- |

## आदेश क्र.(२)

| **पदनाम** | **वेतनस्तर** | **वेतनश्रेणी** |
|---|---|---|
| पोलीस हवालदार | एस-९ | रु.२६४००-८३६००/- |

| **वेतनवाढीचा दिनांक** | **विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती** | **वेतनवाढीचा दिनांक** | **सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती** |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन **१३७४० x२.५७** = ३५३११.८/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णांकीत करुन<br>रु.**३५४००/-** **एस-९** | ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन **१४१६० x२.५७** = ३६३९१.२/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णांकीत करुन<br>रु.**३६५००/-** **एस-९** |
| ०१/०७/२०१६ | रु.३६५००/- एस-९ | ०१/०७/२०१६ | रु.३७६००/- एस-९ |
| ०१/०७/२०१७ | रु.३७६००/- एस-९ | ०१/०७/२०१७ | रु.३८७००/- एस-९ |
| ०१/०७/२०१८ | रु.३८७००/- एस-९ | ०१/०७/२०१८ | रु.३९९००/- एस-९ |
| ०१/०७/२०१९ | रु.३९९००/- एस-९ | ०१/०७/२०१९ | रु.४११००/- एस-९ |
| ०१/०७/२०२० | रु.४११००/- एस-९ | ०१/०७/२०२० | रु.४२३००/- एस-९ |
| ०३/११/२०२० | रु.४११००/- एस-९<br>सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेचा तिसरा लाभ मंजूर परंतू ला.लु.प्र.कायदा १९८८ अन्वये गुन्हा दाखल असल्याने या कार्यालयाचे आदेश दि.२३.०७.२०२१ अन्वये तिसरा लाभ रद्द करण्यात आल्याने देय वेतन. | ०३/११/२०२० | रु.४२३००/- एस-९<br>सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेचा तिसरा लाभ मंजूर परंतू ला.लु.प्र.कायदा १९८८ अन्वये गुन्हा दाखल असल्याने या कार्यालयाचे आदेश दि.२३.०७.२०२१ अन्वये तिसरा लाभ व सपोउपनि पदोन्नती रद्द करण्यात आल्याने देय वेतन. |
| ०१/०७/२०२१ | रु.४११००/- एस-९<br>दि.०९.०९.२०२० ते ०९.०७.२०२१ पर्यंतचा एकुण ३०३ दिवसाचा गैरहजर कालावधी विनावेतन (असाधारण रजा) मंजूर करण्यात आल्याने देय वेतन. | ०१/०७/२०२१ | रु.४२३००/- एस-९<br>दि.०९.०९.२०२० ते ०९.०७.२०२१ पर्यंतचा एकुण ३०३ दिवसाचा गैरहजर कालावधी विनावेतन (असाधारण रजा) मंजूर करण्यात आल्याने देय वेतन. |
| १९/०७/२०२१ | रु.४११००/- एस-९<br>सपोउपनि पदी नियमीत पदोन्ती परंतू ला.लु.प्र.कायदा १९८८ अन्वये गुन्हा दाखल असल्याने या कार्यालयाचे आदेश दि.२३.०७.२०२१ अन्वये सपोउपनि पदोन्नती रद्द करण्यात आल्याने देय वेतन. | १९/०७/२०२१ | रु.४२३००/- एस-९<br>सपोउपनि पदी नियमीत पदोन्ती परंतू ला.लु.प्र.कायदा १९८८ अन्वये गुन्हा दाखल असल्याने या कार्यालयाचे आदेश दि.२३.०७.२०२१ अन्वये सपोउपनि पदोन्नती रद्द करण्यात आल्याने देय वेतन. |
| ०१/०७/२०२२ | रु.४२३००/- एस-९<br>दि.१०.०७.२०२१ ते २२.११.२०२१ या कालावधीत कर्तव्यावर उपस्थित तसेच दि.२३.११.२०२१ ते १७.०९.२०२२ पर्यंतचा एकुण ३०० दिवसाचा गैरहजर कालावधी अर्जित रजा म्हणुन मंजूर करण्यात आल्याने देय वेतन. | ०१/०७/२०२२ | रु.४३६००/- एस-९<br>दि.१०.०७.२०२१ ते २२.११.२०२१ या कालावधीत कर्तव्यावर उपस्थित तसेच दि.२३.११.२०२१ ते १७.०९.२०२२ पर्यंतचा गैरहजर कालावधी अर्जित रजा म्हणुन मंजूर करण्यात आल्याने देय वेतन. |
| ०१/०७/२०२३ | रु.४३६००/- एस-९<br>दि.१८.०९.२०२२ ते १२.०१.२०२३ पर्यंतचा एकुण **११७ दिवसाचा गैरहजर कालावधी परावर्तीत रजा** व दि. १३.०१.२०२३ ते १२.०६.२०२३ पर्यंतचा एकुण **१५१ दिवसाचा गैरहजर कालावधी असाधारण रजा** म्हणुन मंजूर करण्यात आल्याने तसेच **दि.१३.०६.२०२३ ते १२.०५.२०२४ पर्यंतचा निलंबन कालावधी सर्व प्रयोजनार्थ कर्तव्यकाळ** म्हणुन गणण्यात आल्याने अनुज्ञेय वेतन. | ०१/०७/२०२३ | रु.४४९००/- एस-९<br>दि.१८.०९.२०२२ ते १२.०१.२०२३ पर्यंतचा एकुण **११७ दिवसाचा गैरहजर कालावधी परावर्तीत रजा** व दि. १३.०१.२०२३ ते १२.०६.२०२३ पर्यंतचा एकुण **१५१ दिवसाचा गैरहजर कालावधी असाधारण रजा** म्हणुन मंजूर करण्यात आल्याने तसेच **दि.१३.०६.२०२३ ते १२.०५.२०२४ पर्यंतचा निलंबन कालावधी सर्व प्रयोजनार्थ कर्तव्यकाळ** म्हणुन गणण्यात आल्याने अनुज्ञेय वेतन. |
| १२/०५/२०२४ | रु.४३६००/- एस-९<br>दि.१२.०५.२०२४ रोजी मयत | १२/०५/२०२४ | रु.४४९००/- एस-९<br>दि.१२.०५.२०२४ रोजी मयत |

प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या सुधारीत वेतननिश्चितीमुळे अनुज्ञेय असणारी थकबाकी रोखीन अदा करण्यात यावी. तसेच सदरची वेतन निश्चिती ही वेतन पडताळणी पथक यांचे अतिम तपासणीचे अधीन राहून करण्यात आली असून भविष्यात रकमेचे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर अतिप्रदानाची रक्कम त्यांचे कडून वसूल करण्यात येईल.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस